**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

---

**तातडीचे/परीक्षा प्राधान्य/कालमर्यादीत**
**स्मरणपत्र क्र. १**

क्र.कोविमं/शाखा माध्य.गोप./पॅनेल २०१९-२१/ 2088
दिनांक - 3/११/२०१८

प्रति,
मुख्याध्यापक
-----------------------------
-----------------------------

**विषय** :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०१९ ते मार्च २०२१ परीक्षांसाठी परीक्षक/नियामक नेमणुकीसाठी तयार करावयाच्या पॅनेलबाबत तसेच मार्च २०१९ च्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी शिक्षकांची माहिती पाठविणेबाबत...

**संदर्भ** :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र.कोविमं/शाखा माध्य.गोप./पॅनेल २०१९-२१/१६६९ दि.२५/०९/२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, या विभागीय मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या इ. १०वी च्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीकरीता सन २०१९ ते २०२१ या कालावधीकरीता परीक्षक/नियामकांचे नव्याने पॅनेल तयार करण्याचे काम सुरु आहे. तसेच मार्च २०१९ च्या प्रात्यक्षिक विषयांच्या परीक्षांसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्तीचीही कार्यवाही करावयाची आहे. या संदर्भात असे दिसून येते की,

१. मंडळाने मागविलेली विहित नमुन्यातील आपलेकडील शिक्षकांची संगणकीय स्वरुपातील माहिती अद्यापही या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तरी याबाबत आपणास अंतीम सुचना देण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळेत शिकविले जात असलेले तसेच प्रात्यक्षिक विषयासाठी आवश्यक असलेल्या **'प्रत्येक विषय शिक्षकांची माहिती'** दि.15 /११/२०१८ पूर्वी या कार्यालयास न चुकता हस्तपोच सादर करावी.

२. आपण या कार्यालयाकडे पाठविलेली माहिती अपूर्ण असल्याचे दिसून आले आहे तरी ------------ ------------ ----- -------- ------------ ------------ ------------ ------------ ------------ ------------ ------------ या विषयांच्या शिक्षकांची माहिती त्वरीत स्वतंत्र पत्राद्वारे मंडळास कळविण्यात यावी. पूर्ण वेळ, अर्ध वेळ, तासिका तत्वावरील, शिक्षण सेवक, विना अनुदानीत तसेच शिक्षकांना अद्याप मान्यता नाही इ. असा शिक्षकांचा कोणताही प्रकार असला तरी माहिती पाठविणे अनिवार्य व आवश्यक आहे. आपणाकडील एखादा शिक्षक एकपेक्षा अधिक विषय शिकवीत असलेस संबंधित शिक्षक कोणत्या विषयाची उत्तरपत्रिका तपासू इच्छित आहे त्याचीही नोंद शेरा या रकान्यात लाल शाईने दर्शविण्यात यावी.

या संदर्भात पुन:श्च आपणास कळविण्यात येते की, आपणांकडून उपरोक्त तपशिलवार माहिती त्वरीत हस्तपोच प्राप्त न झाल्यास आपल्या शाळेस असलेली मंडळाची मान्यता काढून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. याबाबत आपल्याकडून विलंब अथवा असहकार्य आढळलेस होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

माहिती खालील तक्त्याच्या स्वरूपात असावी :-

| विषय व कोड नंबर | माध्यम | शिक्षकाचे नांव व बँक खाते क्रमांक | सेवानिवृत्ती दिनांक व IFSC कोड | शिकविण्याचा अनुभव | अनुभव (टर्म) | | मोबाईल क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | परीक्षक | नियामक | | |
| | | | | | | | | |